पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८.

**मा. शिक्षण समिती**

कार्यपत्रिका क्रमांक - ११

**सभावृत्तांत**

दिनांक - **०६/१२/२०१८** वेळ - दुपारी **२.००** वा.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.शिक्षण समितीची पाक्षिक सभा **गुरुवार** दिनांक **०६/१२/२०१८** रोजी दुपारी **२.००** वाजता महापालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

**१. मा.प्रा.सोनाली दत्तात्रय गव्हाणे - सभापती**
२. मा.बाबर शर्मिला राजू - उपसभापती
३. मा.बुर्डे सुवर्णा विकास
४. मा.सोनवणे शारदा हिरेन
५. मा.भोंडवे संगिता राजेंद्र
६. मा.काळे उषा दिलीप
७. मा.अश्विनी गजानन चिंचवडे- पाटील

या शिवाय मा.उल्हास जगताप – नगरसचिव, मा.जोत्स्ना शिंदे – प्रशासन अधिकारी (प्राथमिक शिक्षण विभाग), हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

----------

**उपस्थित सन्मा. सदस्यांचे संमतीने खालील ऐनवेळचे विषय सभा कामकाजामध्ये दाखल करुन घेणेत आले.**

विषय क्र.१) पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या शाळांमध्ये उन्नती प्रकल्प राबविण्याबाबत.- मा.शर्मिला बाबर , मा.शारदा सोनवणे यांचा प्रस्ताव.

विषय क्र.२) शाळेतील विद्यार्थ्यांकरीता बस प्रवास सुविधा उपलब्ध करुन देणेबाबत. – मा.सुवर्णा बुर्डे ,मा.शर्मिला बाबर यांचा प्रस्ताव.

विषय क्र.३) शिक्षण विभागाच्या प्राथमिक शाळांमध्ये विद्यार्थ्यांकरीता आरोग्य सेवा व विमा काढणेबाबत.- मा.शर्मिला बाबर , मा.शारदा सोनवणे यांचा प्रस्ताव.

----------

दिनांक **१५/११/२०१८** रोजी झालेल्या सभेचा (**कार्यपत्रिका क्रमांक १०**) सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा.सभापती यांनी प्रकट केले.

----------

**सभा कामकाजामध्ये दाखल करुन घेणेत आलेले विषय घेणेत आले.**

ठराव क्रमांक – ४२ विषय क्रमांक – ०१
दिनांक - ०६/१२/२०१८
सुचक : मा.शर्मिला बाबर अनुमोदक : मा.शारदा सोनवणे
संदर्भ :- मा.शर्मिला बाबर, मा.शारदा सोनवणे यांचा प्रस्ताव –

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या सर्व शाळांमध्ये प्रत्येक विद्यार्थ्याला अक्षर अंक,ओळख,वाचन,लेखन,गणिती क्रीया यांचे ज्ञान असावे यासाठी प्राथमिक विभागातील विद्यार्थ्यांसाठी अध्ययन स्तर निश्चितीसाठी उन्नती हा प्रकल्प घेण्यात यावा. याद्वारे सर्व विद्यार्थ्यांची गुणवत्ता वाढेल. यात शून्य ते चार अशा क्रमानुसार विद्यार्थ्यांचा गुणवत्ता स्तर तपासला जाईल. यानुसार शून्य स्तर असलेल्या विद्यार्थ्यांचा स्तर वाढवण्यासाठी शिक्षकांनी प्रयत्न करायचा आहे. ठरवून दिलेल्या निकषांनुसार विद्यार्थी प्रगत नसेल तर मुख्याध्यापकांना त्यासंदर्भातील नोटीस पाठविण्यात येईल. शिक्षण विभाग डिसेंबर अखेर शाळांचा सर्व्हे करणार आहे. विद्यार्थ्यांच्या प्रगतीची नोंद शिक्षक ठेवणार आहेत. ही माहिती मुख्याध्यापकांना दिली जाईल आणि त्यानंतर ती माहिती पर्यवेक्षकांकडे जमा होईल. त्यानुसार प्रत्येक विद्यार्थ्यांच्या प्रगतीकडे लक्ष देण्याचा उपरोक्त प्रमाणे उन्नती प्रकल्पाचा मानस असून सदर प्रकल्प राबविणेकामी मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ४३ विषय क्रमांक – ०२
दिनांक - ०६/१२/२०१८
सुचक : मा.सुवर्णा बुर्डे अनुमोदक : मा.शर्मिला बाबर
संदर्भ :- मा.सुवर्णा बुर्डे , मा.शर्मिला बाबर यांचा प्रस्ताव –

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या १) पंडीत जवाहरलाल नेहरु प्राथमिक शाळा च-होली २) वडमुखवाडी प्राथ.शाळा, वडमुखवाडी या शाळेकरीता विद्यार्थी वाहतुक बस सुविधा उपलब्ध होणेकामी स्थानिक नगरसेवक मा.सौ.सुवर्णा बुर्डे, मा.नितीन काळजे, मा.सौ.विनया प्रदिप तापकीर - शिक्षण समिती सदस्या तसेच मा.मुख्याध्यापक यांनी पत्राद्वारे विद्यार्थी वाहतुक सुविधा पुरविणेकामी मागणी केली आहे. २ ते ३ कि.मी. अंतरातील आहेत असा अहवाल पर्यवेक्षीका सौ.माने पुष्पा यांनी दिला आहे. तसेच ३) बबनराव भोंडवे प्राथ.शाळा रावेत व ४) पुनावळे प्राथमिक शाळा,पुनावळे या शाळेकरीता स्थानिक नगरसेविका मा.सौ.संगितताई भोंडवे, मा.रेखाताई दर्शले यांनी शिफारस केली आहे. तसेच मा.मुख्याध्यापक यांनी देखील मागणी केली आहे. या शाळेतील अनेक विद्यार्थी गोर-गरिब मोल मजूरी करणा-या कामगारांची आहेत. त्यांना अनेक वर्षापासून डोअर स्टेप या सामाजिक संस्थेमार्फत विद्यार्थ्यांना वाहतुक सुविधा पुरविण्यात आली होती. त्यांची आर्थिक स्थिती नसल्याने त्यांचे काम नोव्हेंबर अखेर बंद झाल्याने विद्यार्थ्यांना शाळेत जाणेकामी बस सुविधा उपलब्ध नाही. त्यामुळे विद्यार्थ्यांचे नुकसान होत आहे. डोअर स्टेप या सामाजिक संस्थेमार्फत देखील विद्यार्थी वाहतुककरीता वारंवार मागणी करण्यात आली आहे. तसेच सन्मा. सोनालीताई गव्हाणे, सभापती शिक्षण समिती यांनी देखील

प्रत्यक्ष भेट देऊन पाहणी केली आहे. तरी विद्यार्थी वाहतुक सुविधा उपलब्ध होणेकामी पर्यवेक्षक यांनी खालील प्रमाणे विद्यार्थी संख्या अहवाल सादर केला आहे.

| अ.क्र. | शाळेचे नांव | विद्यार्थी संख्या | एकुण |
|---|---|---|---|
| १ | च-होली प्राथमिक शाळा | ४८ | ४८ |
| २ | वडमुखवाडी प्राथमिक शाळा | २९ | २९ |
| ३ | पुनावळे कन्या प्राथमिक शाळा | ६० | ६० |
| ४ | पुनावळे मुले प्राथमिक शाळा | ८१ | ८१ |
| ५ | रावेत प्राथमिक शाळा | ५२ | ५२ |
| | **एकुण** | **२७०** | **२७०** |

तरी वरील सदर शाळेतील विद्यार्थी कष्टकरी कामगार वर्गातील असल्याने त्यांचे पाल्य शाळेत जाणेकामी वाहतुक खर्च करु शकत नाही.याचा विचार करुन विद्यार्थ्यांना वाहतुक सुविधा उपलब्ध करुन दिल्यास निश्चितच शाळेच्या पटसंख्येत व गुणवत्तेमध्ये वाढ होणार असल्याने व कोणीही प्राथमिक शिक्षणापासून वंचित राहू नये याकामी सदर शाळातील विद्यार्थ्यांना वाहतुक बस सुविधा उपलब्ध करुन देणेकामी शिक्षण विभागामार्फत मनपाचे इतर शाळांचे सर्वेक्षण करुन त्या शाळांचा समावेश करुन प्रशासनाकडून सदरचा एकत्रित विषय मा.स्थायी समितीच्या मान्यतेकामी ठेवणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ४४ विषय क्रमांक – ०३

दिनांक - ०६/१२/२०१८

सुचक : मा.शर्मिला बाबर अनुमोदक : मा.शारदा सोनवणे

संदर्भ :- मा.शर्मिला बाबर , मा.शारदा सोनवणे यांचा प्रस्ताव –

पिंपरी चिंचवड महानगरपालिका प्राथमिक शाळांमध्ये सध्या मा.महापौर, पिंपरी चिंचवड महानगरपालिका, तसेच शिक्षण समिती सदस्य, मा.प्रशासन अधिकारी, शिक्षण विभाग यांचे शाळा पाहणी दौरा पूर्ण झाला आहे. तरी सदर शाळा पाहणी दौ-यामध्ये मनपा शाळांमधील विद्यार्थ्यांकरीता मनपा कर्मचा-यांप्रमाणे आरोग्य सेवा व विमा काढणे आवश्यक असलेचे दिसून आले आहे. या विमामुळे मनपा शाळांमधील विद्यार्थ्यांना वैद्यकिय उपचार करावयाचा झालेस मोफत उपचार करणे शक्य होणार आहे. याकरीता शिक्षण विभागाकडील लेखाशिर्ष “विद्यार्थी आरोग्य” या लेखाशिर्षावर आवश्यक तरतूद करुन बाजारातून विमा कंपनीकडून याकामी दर मागवून विद्यार्थी विमा काढणेकामी पुढील कार्यवाही करणेस मान्यता देणेत येत आहे. यामुळे मनपा शाळांमध्ये विद्यार्थ्यांचा कल वाढणार असून पिंपरी चिंचवड महानरगपालिकेचा नावलौकीक वाढणार आहे. तरी याबाबत महानगरपालिकेच्या प्राथमिक शाळांमधील विद्यार्थ्यांसाठी आरोग्य सेवा व विमा काढणे मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

यानंतर मा.सभापती यांनी सभा संपल्याचे जाहिर केले.

**(सोनाली दत्तात्रय गव्हाणे)**
**सभापती**
शिक्षण समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी १८. नगरसचिव कार्यालय
क्रमांक : नस/४/कावि/७५३/२०१८
दिनांक : ०६/१२/२०१८

**(उल्हास बबनराव जगताप)**
**नगरसचिव**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी ४११ ०१८.

प्रत : सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांचेकडे पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.